# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.10.2024** **वार – गुरुवार**

---

**<u>उमेदवारी अर्ज</u>**

भाजपाचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांनी आज शक्तीप्रदर्शन करत कोथरूड विधानसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. कोथरूडच्या छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून पाटील यांच्या पदयात्रेला सुरुवात झाली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर आदी यावेळी उपस्थित होते. कोथरूड विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे किशोर शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली आहे; मात्र महाविकास आघाडीतर्फे अजूनही उमेदवाराची घोषणा करण्यात आलेली नाही.

**<u>रिपब्लिकन पार्टी</u>**

महायुतीच्या जागा वाटपाच्या चर्चेत पक्षाला सहभागीही करून घेण्यात आले नाही असा आरोप करत पुण्यातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, आठवले गटाने महायुतीच्या प्रचारात सहभागी होणार नसल्याची घोषणा केली आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी काल पुण्यात याबाबत माहिती केली. जागा वाटपाचा तिढा जोपर्यंत सुटत नाही, तोपर्यंत पक्षाचे कार्यकर्ते 'महायुतीच्या' प्रचारात सहभागी होणार नसल्याचं या वेळी सांगण्यात आलं.

**<u>जनजागृती</u>**

पिंपरी,चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आरखडा तयार करण्यात आला असून शहरी मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये 'नो युवर वोटींग सेंटर' ही हेल्पलाईन देखील सुरू करण्यात येणार असल्याचं पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय कुमार खोराटे यांनी सांगितलं. दरम्यान अजंठानगरच्या 'होम फॉर द ब्लाईंड; या अपंग रोजगार उद्योग आणि तांत्रिक प्रशिक्षण केंद्रात मतदार जागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात अंध मतदारांनी मतदानाची शपथ घेतली. तसंच सर्व पात्र मतदारांनी मतदान करावं असं आवाहन केलं.

**<u>पुणे मनपा</u>**

राजाराम पुलाजवळील मैलापाणी प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया केलेलं पाणी तळजाई वन विभागातील झाडांना देण्याबाबत पुणे महापालिका विचार करत आहे. यासंदर्भात वनविभागाकडे देखिल विचारणा करण्यात आली असून त्यांच्या मान्यतेनंतरच आवश्यक आराखडा तयार करून अंमलबजावणी करण्यात येईल, अशी माहिती अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी दिली.

**<u>कारवाई</u>**

प्रवाशांकडून जास्त भाडं आकारणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्स चालकांवर आता कडक कारवाई होणार आहे. पुणे आरटीओ कार्यालयानं त्यासाठी विशेष पथकांची नेमणूक केली आहे. जास्त भाडे आकारल्यास त्याचं तिकीट, आणि

गाडी क्रमांकाचा फोटो आरटीओच्या 8275330101 या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवून तक्रार करता येईल असं पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी  स्वप्निल भोसले यांनी कळवलं आहे.

**आग**

नवी पेठेतील अभ्यासिकेला नुकत्याच लागलेल्या आगीनंतर पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील अभ्यासिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न चर्चेत आला आहे. अशा घटना टाळण्यासाठी आग प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत अभ्यासिकांची तपासणी करून संबधितांमध्ये जनजागृती करण्याचे आदेश महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी अग्निशामक दलाला दिले आहेत. त्यानुसार अग्निशामक दल आणि महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे सदाशिव पेठेतील अभ्यासिकांची तपासणी करत काहींना नोटीसा बजावल्या आहेत.

**ससून**

ससून रुग्णालयावरील न्यायवैद्यक प्रकरणांचा ताण वाढल्याने त्यांचे अहवाल मिळण्यासही विलंब होत होता. ससून रुग्णालयातील रुग्णसंख्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. त्यातच न्यायवैद्यक प्रकरणांचा भारही ससूनवर आहे. तो कमी करण्यासाठी आता पोलीस प्रशासन आणि ससून सर्वोपचार रुग्णालय यांच्याकडून पावले उचलली जात आहेत. हडपसर आणि वानवडी पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील न्यायवैद्यक प्रकरणे आता सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयात म्हणजे एएफएमसी पाठवण्यात येणार आहेत. अतिरिक्त पोलीस आयुक्तांनी याबाबतचे पत्र हडपसर, वानवडी पोलीस ठाण्यांना आणि एएफएमसी तसंच ससूनला पाठविले आहे.

**अपघात**

भोसरी इथल्या सद्गुरु नगर परिसरात आज सकाळी पाण्याची टाकी कोसळून झालेल्या दुर्घटनेमध्ये तीन मजुरांचा मृत्यू झाला असून 15जण जखमी आहेत. एका खासगी प्रकल्पाच्या परिसरात ही दुर्घटना घडली. अग्निशमन दलाच्या मदतीने बचावकार्य करण्यात येत असून ढिगारा हटवण्याचं काम अद्यापही सुरु आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला दुसरा कसोटी क्रिकेट सामना आजपासून पुण्यात सुरु झाला. पहिल्याच दिवशी भारताच्या दोन फिरकीपटूनी न्यूझीलंडचा डाव 259 धावांत गुंडाळला. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला; मात्र रविचंद्रन अश्विन आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर न्यूझीलंडचा पूर्ण संघ 259 धावा करून तंबूत परतला. वॉशिंग्टन सुंदरनं सात तर रविचंद्रन अश्विननं तीन गडी बाद केले. आजच्या दिवसाच्या खेळ संपला तेव्हा भारताच्या 1 गडी बाद 16 धावा झाल्या होत्या. शुभमन गिल 10 तर यशस्वी जैस्वाल 6 धावांवर खेळत आहेत.

**हवामान**

पुण्यात उद्या आकाश निरभ्र राहण्याचा अंदाज असून कमाल तापमान 34 अंश सेल्सियसच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**